# संविधानाच्या आधारे संघर्ष करावा : डॉ. भोसले

## भटके विमुक्त दिन साजरा

▶▶ नाशिक । प्रतिनिधी

बंडखोर आणि ज्ञानी अशी ओळख असणार्‍या भटके विमुक्त समूहाने संविधानाच्या आधारे संघर्ष करावा, असे आवाहन डॉ. नारायण भोसले यांनी केले.

भटकेविमुक्तआणिआदिवासी संयोजन समितीच्यावतीने येथील औरंगाबादकर सभागृहात भटके




विमुक्त दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात नागेश धुर्वे आणि सहकार्‍यांनी मनाच्या गम्मत, या माध्यमातून केलेल्या लोकप्रबोधनाने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नाशिक महानगरपालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय देवकर यांनी भूषवले. त्यांनी आपला जीवनप्रवास सांगताना शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे अधोरेखित करत आरोग्य आणि महिला विकास यावर मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजन समितीचे प्रभाकर धात्रक, महादेव खुडे, सविता जाधव, शोभा पवार, कमल मते, संगीता कुमावत, सुधा घोडेस्वार, मौलाना सलीम, अ‍ॅड. काझी, पद्माकर इंगळे यांनी विशेष परिश्रम घेतले. नंदा पवार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमात नाथपंथी समाजाचे संतोष सावंत, वडार समूहाचे माजी नगरसेवक लक्ष्मण धोत्रे, छप्परबंद समाजाचे लालाभाई शहा आणि तारू नावाडी समाजाचे पद्माकर इंगळे यांनी आपले अनुभव कथन केले. संतोष जाधव यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली, तर महादेव खुडे यांनी आभारप्रदर्शन केले.

संयोजन समितीमार्फत लवकरच सक्रिय कार्यकर्त्यांसाठी तीन दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

पान १ वरून ..

# आता कडक उपोषण

## मंत्री, नेत्यांना कानपिचक्या

मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण घ्यायला मी खंबीर आहे. आंदोलन संपूद्या, मग निलेश राणे यांच्याकडे बघतो. दादांना सांगितले होते, त्यांना शांत बसवा. राज ठाकरे कुचक्या कानाचे आहेत. चंद्रकांत पाटील यांनी शांत राहावे. त्यांनीच पडताळण्या रोखल्या होत्या, असा दावा करीत मनोज जरांगे यांनी मंत्री आणि नेत्यांना कानपिचक्या दिल्या. राजकीय लोक नेते, मंत्री नासके असतात. हैदराबाद आणि सातार्‍याचे गॅझेट पुरावे म्हणून आहेत. आमची मागणी संविधानाला धरून आहे. मराठे आता घरी थांबणार नाहीत. पुढच्या शनिवारी आणि रविवारी यापेक्षा आणखी मोठी गर्दी होईल, असेही जरांगे म्हणाले.

## भारत-चीन विकासाचे भागीदार

परस्पर स्वीकारार्ह तोडगा काढण्याची आपली वचनबद्धता दोन्ही नेत्यांनी व्यक्त केली. कैलास मानसरोवर यात्रा आणि पर्यटक व्हिसा पुन्हा सुरू झाल्यामुळे थेट उड्डाणे आणि व्हिसा सुलभ करून जनतेचे-जनतेशी संबंध बळकट करण्याची गरज मोदी-जिनपिंग यांनी नमूद केले. आर्थिक आणि व्यापार संबंधांवर बोलताना जागतिक व्यापार स्थिर ठेवण्यासाठी दोन्ही अर्थव्यवस्थांच्या भूमिकेची त्यांनी दखल घेतली. द्विपक्षीय व्यापार, गुंतवणूकविषयक संबंध वाढवण्यासाठी व व्यापार तूट कमी करण्यासाठी राजकीय आणि धोरणात्मक दिशेने पुढे जाणे आवश्यक असल्याचे दोन्ही नेत्यांनी सांगितले. पंतप्रधानांनी चीनमधील कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिट ब्युरोच्या स्थायी समितीचे सदस्य काई ची यांचीही भेट घेतली.

काई यांच्यासोबत बोलताना द्विपक्षीय संबंधांसाठी आपला दृष्टीकोन सांगितला. दोन्ही नेत्यांच्या दृष्टीकोनाची पूर्तता करण्यासाठी त्यांचा पाठिंबा मागितला. काई यांनी दोन्ही नेत्यांत झालेल्या सहमतीनुसार द्विपक्षीय देवाण-घेवाण वाढवण्याविषयी आणि संबंध सुधारण्याविषयी चीनकडून व्यक्त होणार्‍या इच्छेचा पुनरुच्चार केला.

# शिक्षक, शिक्षकेतरांच्या वेतनात होणार वाढ

▶▶ नाशिक । प्रतिनिधी

शालेय शिक्षण विभागाने राज्यातील खासगी विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळा, तुकड्या व त्यावरील कार्यरत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचार्‍यांना वाढीव टप्पा अनुदान मंजूर केले आहे. त्यानुसार, २० ते ६० टक्के टप्पा अनुदानामध्ये २० टक्के वाढ करण्यात आली आहे. या निर्णयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचार्‍यांनी स्वागत केले आहे. हे अनुदान मंजूर करतानाच शासनाने कर्मचार्‍यांची उपस्थिती बायोमेट्रिक पद्धतीने नोंदवणे बंधनकारक केले आहे.

राज्यात २० ते ६० टक्के अनुदानित तत्त्वावर कार्यरत असलेल्या शाळांना वाढीव अनुदान लागू करण्यात आले आहे. त्यामुळे ५२ हजार २७६ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचार्‍यांची वेतनवाढ होणार असून, वाढीव टप्पा अनुदानासाठी ९७० कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर करण्यात आला आहे. अनुदानासाठी ११ नोव्हेंबर २०२२ नंतर पहिल्यांदाच नव्याने प्रस्ताव सादर करून मूल्यांकन होऊनही शासन स्तरावर अघोषित असलेल्या प्राथमिक माध्यमिक, उच्च माध्यमिकच्या २३१ शाळा, ६९५ तुकड्यांनाही २० टक्के अनुदान जाहीर करण्यात आले आहे. त्याचा लाभ २,७१४ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचार्‍यांना मिळणार आहे.

शासन निर्णयानुसार जाहीर टप्पा अनुदानात प्रामुख्याने २० टक्के टप्पा अनुदानावर आलेल्या २ हजार ६९ शाळा, चार हजार १८२ वर्ग तुकड्यांना अधिकचे २० टक्के अनुदान मंजूर केले आहे. याचा लाभ १५,८५९ शिक्षक आणि शिक्षकेतर मिळणार आहे. या पूर्वी ४० टक्के टप्पा अनुदान मिळत असलेल्या शाळांना अतिरिक्त २० टक्के अनुदान मंजूर झाले आहे. त्यात १ हजार ८७१ शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, दोन हजार ५६१ वर्ग तुकड्यांना हे अनुदान मंजूर झाले आहे. त्यामुळे १३ हजार ९५९ शिक्षक आणि शिक्षकेतरांना लाभ होईल. तसेच, ६० टक्के टप्पा अनुदान घेत असलेल्या शिक्षकांना अधिकचे वाढीव २० टक्के अनुदान आणि त्यासाठीचा निधी मंजूर झाला आहे. त्याचा लाभराज्यातील एकूण १ हजार ८९४ शाळा, दोन हजार १९२ वर्ग तुकड्यांवरील १९,७४४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्‍यांना होईल.

### बॉयोमेट्रिक बंधनकारक

नवीन अनुदान लागू करताना काही नियम-अटीही लागू करण्यात आल्या आहेत. त्यानुसार शिक्षकांची संख्या २०२४-२५च्या संचमान्यतेनुसार निश्चित केली जाणार आहे. आधार क्रमांकाची पडताळणी झालेल्या विद्यार्थ्यांचीच संख्या संचमान्यतेसाठी विचारात घेतली जाणार आहे. संबंधित शाळांतील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचार्‍यांची उपस्थिती बायोमेट्रिक पद्धतीने नोंदवणे बंधनकारक असेल. बायोमेट्रिक उपस्थिती न नोंदवल्यास अनुदान रोखण्यात येईल. बायोमेट्रिक प्रणाली बसवण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# राजाराम पानगव्हाणेंना ग्रीन लीडरशिप पुरस्कार



▶▶ नाशिक । प्रतिनिधी

ब्रह्मा व्हॅली ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे संस्थापक अध्यक्ष श्री. राजाराम पानगव्हाणे (पाटील) यांना आंतरराष्ट्रीय हवामान शिखर परिषद २०२५ मध्ये, नवी दिल्लीतील पीएचडी हाऊस येथे प्रतिष्ठित ग्रीन लीडरशिप पुरस्कार प्रदान करण्यात आला.

'पर्यावरण-जागरूक' शैक्षणिक कॅम्पस उभारण्यात व शाश्वत जीवनशैली रोजच्या व्यवहारात रुजविण्यात दाखविलेल्या दूरदर्शी नेतृत्वासाठीफ हा पुरस्कार पाटील यांना देण्यात आला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ब्रह्मा व्हॅली समूहाने मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहिमा, कॅम्पस हरितीकरण प्रकल्प आणि समाजाभिमुख पर्यावरण उपक्रम राबवले आहेत. या प्रयत्नांमुळे हजारो विद्यार्थ्यांमध्ये तसेच व्यापक नाशिक समाजामध्ये जबाबदारीची व हरित जीवनशैलीची मूल्ये रुजली आहेत.

हा पुरस्कार स्टेट बँक ऑफ इंडियाचे माजी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राजनीश कुमार, ओएनजीसीचे माजी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. डी. के. सराफ, पीएचडीसीसीआय पर्यावरण समिती व आंतरराष्ट्रीय हवामान शिखर परिषद अध्यक्ष डॉ. जे. पी. गुप्ता आणि पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री सरचिटणीस व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रणजित मेहता यांनी संयुक्तपणे प्रदान केला.

नाशिकसाठी हा सन्मान अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण एका स्थानिक संस्थेने शाश्वत शिक्षण आणि कॅम्पस हरितीकरणामध्ये राष्ट्रीय स्तरावर मापदंड निर्माण केल्याचे तो अधोरेखित करतो. त्यामुळे नाशिक शहराला भारताच्या हवामान नेतृत्वाच्या प्रवासात एक वेगळी ओळख मिळाली आहे.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर राजाराम पाटील यांनी हा सन्मान आपल्या विद्यार्थी, शिक्षकवर्ग आणि समाजाला अर्पण करताना सांगितले की, निसर्गाविषयी आदर व पुढील पिढ्यांविषयी जबाबदारीची भावना जोपर्यंत शिक्षणात रुजवली जात नाही, तोपर्यंत खरे शिक्षण अपूर्णच राहते.

### पुरस्काराचे महत्त्व

ग्रीन लीडरशिप पुरस्कार हा आयसीएस चा एक प्रमुख सन्मान असून, हरित व शाश्वत भविष्यासाठी दिशा दाखविणार्‍या दूरदर्शी व्यक्तींचा गौरव करतो. शिक्षण, उद्योग व तळागाळातील उपक्रमांमधून जे नेते नवनिर्मिती व सामाजिक जबाबदारी एकत्र आणतात, त्यांना हा पुरस्कार देऊन हवामान कृतीची तातडी अधोरेखित केली जाते.

# अभिनेत्री प्रिया मराठे काळाच्या पडद्याआड

**जगाचा निरोप घेतला.**

प्रिया मराठेचा जन्म २३ एप्रिल १९८७ ला ठाणे येथे झाला. मराठी सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या घरात प्रियाचे बालपण घडले. अकरावीत असताना प्रियाला महाविद्यालयीन नाट्य स्पर्धांत भाग घेण्याची संधी मिळाली. तेथूनच प्रियाच्या अभिनय प्रवासाला सुरुवात झाली. पुढे अभिनयातच तिने करिअर सुरू केले.

**हिंदीत यशस्वी पदार्पण**

प्रिया मराठेच्या हिंदी मालिकांतील प्रवासाची सुरुवात 'कसम से' मालिकेतील 'विद्या बाली' या भूमिकेपासून झाली. पुढे 'पवित्र रिश्ता' मालिकेत 'वर्षा' आणि 'बडे अच्छे लगते हैं' मालिकेत 'ज्योती मल्होत्रा'च्या भूमिकांनी तिला घराघरात पोहोचवले.

**नाट्यसृष्टीवर अभिनय छाप**

'साथ निभाना साथिया' मालिकेत प्रियाने 'भावनी राठोड' ही नकारात्मक, पण ठसठशीत भूमिका साकारली. 'स्वराज्यरक्षक संभाजी' मालिकेत तिने 'गोदावरी'ची भूमिका समरसून साकारली. 'तुझेच मी गीत गात आहे' मालिकेतील 'मोनिका'च्या भूमिकेने तिला आणखी लोकप्रियता मिळाली. नाट्यक्षेत्रातही प्रिया सक्रिय होती. 'कोण म्हणतो टक्का दिला' आणि 'परफेक्ट मर्डर'यांसारख्या नाटकांतून प्रियाने रंगभूमीवरही आपल्या अभिनयाची छाप सोडली.

**वैयक्तिक आयुष्य**

अभिनेत्री प्रिया मराठेचा विवाह अभिनेता शंतनू मोघे यांच्याशी २४ एप्रिल २०१२ ला झाला. मोघे यांनीही 'स्वराज्यरक्षक संभाजी' मालिकेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्रियाला बॅडमिंटन, प्रवास आणि वाचनाची विशेष आवड होती. पिझ्झा, पास्ता आणि पुरणपोळी हे तिचे आवडते पदार्थ होते. अध्यात्मिकतेतही तिची आस्था होती.

**प्रिया गुणी मुलगी : प्राजक्ता**

प्रिया मराठे हिच्या निधनाबद्दल मराठी अभिनेत्री आणि सूत्रसंचालक प्राजक्ता माळी हिनेही शोक व्यक्त केला. आम्ही दोघींनी 'एकापेक्षा एक' आणि अनेक कार्यक्रमांत एकत्र काम केले होते. प्रिया मराठे ही एक गुणी, शांत, नम्र आणि सोज्वळ मुलगी होती. ती आपल्या कामाशी काम ठेवायची. तिने कधीच दुसर्‍यांना त्रास दिला नाही. तिच्या कामावर तिचं नितांत प्रेम होतं. तिला कोणी काही बोलले तरी ती उलट उत्तर देत नसे. देव अशी चांगली माणसं का नेतो? असा प्रश्न मला पडला आहे, असे प्राजक्ताने म्हटले आहे.

# जनलक्ष्मी बँकेवरील निर्बंध शिथिल

▶▶ नाशिक । प्रतिनिधी

जनलक्ष्मी को-ऑप बँकेवर रिझर्व्ह बँक इंडियाने (आरबीआय) घातलेले निर्बंध शिथील करण्यात आले आहेत. त्यामुळे बँकेला आर्थिक प्रगती साधताना अधिक गती प्राप्त होईल, असा विश्वास बँकेच्या संचालक मंडळाने व्यक्त केला.

जनलक्ष्मी बँकेची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (ता.३१) परशुराम सायखेडकर सभागृहात पार पडली. भाजपचे शहराध्यक्ष सुनील केदार व शिवसेनेचे उपनेते अजय बोरस्ते यांची प्रमुख उपस्थिती लाभली. बँकेच्या स्थापनेपासून संचालक म्हणून कार्यरत असलेले जयंत जानी यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.

जनलक्ष्मी बँकेने ५० वर्षांचा टप्पा गाठला आहे. ३६ हजार ३२६ सभासद असलेल्या या बँकेकडे १० कोटी ५१ लाखांचे भागभांडवल आहे. तसेच १६० कोटींची ठेवी व ९३ कोटींचे कर्जवाटप केले आहे. आर्थिक वर्षांत या बँकेला ५२ लाखांचा नफा मिळाल्याने बँक आर्थिक सुस्थितीत आली आहे. त्यामुळे 'आरबीआय'ने बँकेवर लावलेले निर्बंध शिथील झाल्याची माहिती अध्यक्ष भालचंद्र पाटील यांनी सभासदांना दिली. सभेतील सर्व विषयांना मंजूरी घेण्यात आली. पुढील वर्षीच्या सर्वसाधारण सभेत सभासदांसाठी विशेष निर्णय घेतले जाणार आहेत. ५० वर्षपूर्तीनिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय या सभेत घेण्यात आला.

यावेळी बँकेचे अध्यक्ष भालचंद्र पाटील, उपाध्यक्ष समीर कांबळे, संचालक जयंत जानी, स्वप्ना निंबाळकर, उत्तमराव उगले, श्रीकांत रहाळकर, रविंद्र अमृतकर, सतिश सोनवणे, शरद गांगुर्डे, संजय पाटील, सागर कांबळे, आनंद करवा, जितेंद्र सामंत, महेंद्र बच्छाव, शालिनी डुंबरे, अ‍ॅड.बाळासाहेब रहाडे, अ‍ॅड.रत्नाकर भडके व मुख्य कार्यकारी अधिकारी भूषण रानडे उपस्थित होते.



# क्लासिफाईड/सुपरमार्केट

## पाहिजेत

**महिला** घरकाम करणारी नौकरानी पाहिजेत - घरकाम के लिए हवी आहे, फक्त देवळाली येथुन सुखसागर सोसायटी, फ्लॅट क्रमांक १, ग्राऊंड फ्लोअर, साईबाबा मंदिराजवळ, देवळाली पोलिस स्टेशनसमोर, वडनेर रोड, देवळाली. टेकचंदानिशी संपर्क साधा - 9529833842, 9373934577. (CM-558)

## खरेदी/विक्री

**इगतपुरी** भावली डॅमजवळ NA फायनल प्लॉट ३००० स्के. फुट विकणे, चांदशी, आडगाव, ॲमिनीटी प्लॉट विकने. ९६३७९१५५९९ (01/09)

**रासबिहारी** शाळेजवळ २००, ४००, ८००, १२०० वार, गंगापूररोड, मखमलाबाद, चांदशी प्लॉट विकने. ९६३७९१५५९९ (01/09)

**देवळाली** कॅम्पमध्ये १०, १२ चि गेराज/गोडाऊन विक्रीसाठी आहे - शहराच्या मध्यभागी, बिचोन बिची स्थित, मुख्य बाजार ते २ मिनिट दुरवर, सुखसागर सोसायटी, देवलाली पोलिस स्टेशनसमोर, साईबाबा मंदिराजवळ, सुरेंद्र ९५२९८३३८४२, ९३७३९३४५७७. राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट/पॅन कार्डसाठी, विमा, पीयूसी साठी तुम्ही संपर्क साधू शकता. (उच-५५८)

## नंबर प्लेटस्

**उच्च** सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेटस् High Security Registration Number Plats मोटार वाहनांसाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेटस्साठी संपर्क साधा - जे आर टी ओ RTO द्वारे अनिवार्य झाले आहे. सुरेंद्र 9529833842, 9373934577 वर संपर्क साधा. राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट/पॅन कार्डसाठी, विमा, पीयूसी साठी तुम्ही संपर्क साधू शकता. (CM-558)

## दारुबंदीचा गुरुमंत्र

**द ग्रेट** साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपिरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत...

## जाहिराती

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
Notice
Name Change
सर्व प्रकारच्या जाहिरातींसाठी
संपर्क - गणेश नाफडे
मो.9922904119

तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26) (CRINV-23-24JL/CRG00555)

## व्यसनमुक्ती

**गॅरंटीने** सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www. drpalve nashamukti kendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26) (CRINV-23-24JL CRG00554)

## सर्व आजारांसाठी

**जुनाट** सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/26) (CRINV-23-24JL/CRG00556)

जाहिरात छोटी ! किमया मोठी !!

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ जाहिरात विभाग, दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆नाशिकरोड : प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६ ◆ निफाड : मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११०० ◆दिंडोरी : दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८ ◆ मालेगांव : पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२ ◆सिन्नर : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.

## वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## निधनवार्ता ..



### सुरेश किरकिरे

**नाशिक।** त्र्यंबकेश्वर तालुक्यातील ओझरखेड येथील सुरेश लहानु किरकिरे (४५) याचे निधन झाले.त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, २ मुली, सून, नातू असा परिवार आहे.



### अभिषेक गायकवाड

**देवळाली कॅम्प ।** वार्ताहर भगूर येथील सावरकर सेनेचे सामाजिक कार्यकर्ते अभिषेक सुभाष गायकवाड (वय २५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, बहिणी, चुलते काकी असा मोठा परिवार आहे.



### रामनाथ पानसरे

**नाशिक ।** मुखेड, ता. येवला, येथील प्रगतशील शेतकरी रामनाथ दगडू पानसरे (८५) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, ३मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.देशदूतचे वसुली अधिकारी किरण विनायक पवार यांचे ते आजोबा होते.



### निंबा धामणे

**नाशिक ।** देवळा तालुक्यातील लोहोणेर येथील रहिवासी निंबा नरहर धामणे (८१) हल्ली मुक्काम नाशिक यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. महापालिकेचे कर्मचारी मनोज धामणे यांचे ते वडील होत.



### पुष्पा नागरे

**नाशिकरोड ।** लाड सुवर्णकार समाजाचे कार्यकर्ते दत्तात्रय नागरे यांच्या पत्नी पुष्पा नागरे (५८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# धबधब्यात पडून पर्यटकाचा मृत्यू

घेण्यासाठी येत असतात. आज सकाळी मालेगाव येथील काही पर्यटक या ठिकाणी पर्यटनासाठी आले होते. त्यापैकी एक जणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. माझ अन्सारी शाहिद अखतर, मो. अमदान अब्दुल हुसेन, शर्जिल खान अमीर खान, मो. अनस नदीम सय्यद हे पर्यटक चोरचावडी या ठिकाणी पर्यटनासाठी आले होते. मात्र या डोहांमध्ये असलेल्या पाण्याचा अंदाज न आल्याने पर्यटनाचा आनंद घेत असलेल्या त्यातील एक जण माझ अन्सारी शाहिद अख्तर (रा. बिरादर बाग, मालेगाव) हा बुडाला. देवळा पोलिसांनी मालेगाव येथील शकील तैराकी यांच्या मदतीने त्याचा मृतदेह शोधून पाण्याबाहेर काढला.

# नदीकाठावर 'कालबाह्य' स्फोटके

(बीडीडीएस) श्वानपथकाला पाचारण करण्यात आले. तपासणी पूर्ण झाल्यावर संबंधित जिलेटीन कांड्या कालबाह्य असल्याचे पथकाने स्पष्ट केले. गणेशोत्सवाचा जल्लोष वाढत असताना भरवस्तीत या स्वरूपाचे घातक व स्फोटक पदार्थ आढळल्याने शहरात दुपारनंतर एकच खळबळ उडाली. काहींनी या जिलेटीनचे लाईव्ह चित्रण करुन सोशल मिडियावर रिल्स अपलोड केल्याचे आढळून आले. पोलिसांनीही तातडीने धाव घेऊन परिस्थिती नियंत्रित केली. मात्र, सणोत्सवात हे विघातक कृत्य करण्याचा डाव आखणारे किंवा अजाणतेपणातून हे कृत्य करणार्‍यांचा माग आता पोलीस काढत आहेत. संबंधित संशयितांना ताब्यात घेण्यासह आवश्यक कारवाईस प्रारंभ झाला आहे.

दरम्यान, जिलेटीन कांड्या स्फोटक असून त्यांचा वापर विशेषतः खाणकाम, विहिरी खणणे, डोंगर व रस्ते किंवा इतर कामांदरम्यान अडथळा ठरणारे मोठमोठे दगड किंवा खडक फोडण्यासाठी केला जा-तो. यात मोठे छिद्र करून त्यात कांड्या ठेवल्या जातात, त्यानंतर लांबून (लांब अंतरावरुन) वात पेटवून स्फोट घडवून आणला जातो. कांड्यांचा स्फोट होऊन दुर्घटनाही घडल्या आहेत. यात अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. कधीकधी विकृत प्रवृत्तीचे लोक जाणून बुजून या कांड्यांचा वापर करून विध्वंस घडवतात, असेही समोर आले आहे.